# आली सर धावून

पुन्हा एकदा आकाशातून आली सर धावून
पुन्हा एकदा सुगंध येतो माती मातीतून

नभांगणावर अखंड लगबग मेघा मेघातून
क्षितीजावर आरास होतसे इंद्रधनू उतरून

थेंब टपोरे झेलून घेती झाडे पानावर
जलधारांचा नाच चालला खाली जमिनीवर

पुन्हा एकदा वने-वासरे गाती आनंदून
मोर नाचती स्वच्छंदाने राना रानातून

**नरेंद्र प्रभू**
**www.prabhunarendra.blogspot.com**
**www.shabdshabd.blogspot.com**